# ज्योतिर्मयी

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १७० वा ❑ भारतीय सौर दिनांक २९ श्रावण शके १९४८, गुरूवार दि.२० ऑगस्ट २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## ग्रामीण व दुर्गम आदिवासी भागातील वास्तव अजूनही भीषण

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

स्वातंत्र्याचा अमृतकाळ साजरा करत असताना आणि देश महासत्तेच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे दावे होत असताना, ग्रामीण व दुर्गम आदिवासी भागातील वास्तव मात्र अजूनही भीषण, क्लेशदायक आणि सुन्न करणारे आहे. रस्त्याची साधी सोय नसल्यामुळे वेळेवर रुग्णवाहिका न पोहोचल्याने एका गरोदर मातेला प्रसूतीनंतर आपले प्राण गमवावे लागल्याची हृदयद्रावक घटना चंद्रपूर जिल्ह्यातील जीवती तालुक्यातील घोडणकप्पी येथे घडली. या दुर्दैवी आघाताने खचून न जाता आणि निष्क्रीय प्रशासनाची वाट न पाहता, गावातील नागरिकांनी एकत्र येत स्वतःच रस्ता तयार करण्याचा विडा उचलला. मृत महिलेचे पती तुळशीराम गेडाम यांच्या पुढाकाराने अवघ्या २० घरांच्या या पाड्याने श्रमदानातून १.५ किलोमीटरच्या खडकाळ रस्त्याची दुरुस्ती व सपाटीकरणाचे काम युद्धपातळीवर हाती घेतले आहे.

घोडणकप्पी हे सुमारे २० उंबऱ्यांचे एक अतिदुर्गम आदिवासी खेडे आहे. या गावाला मुख्य रस्त्याशी जोडणारा पक्का किंवा मोटारयोग्य मार्ग वर्षानुवर्षे उपलब्ध झालेला नाही. पावसाळ्यात चिखल आणि इतर ऋतूंमध्ये मोठमोठे टोकदार दगड यामुळे येथून पायी चालणेही जिकिरीचे ठरते. दोन महिन्यांपूर्वी गावातील संगीता गेडाम यांची प्रसूतीनंतर प्रकृती अचानक खालावली. कुटुंबीयांनी तत्काळ रुग्णवाहिकेसाठी संपर्क साधला; मात्र रस्त्यावरील बिकट परिस्थितीमुळे रुग्णवाहिका वेळेत गावात पोहोचूच शकली नाही. परिणामी, प्राथमिक उपचारांअभावी संगीता यांनी रस्त्यातच तडफडून प्राण सोडले. वेळेवर साधी वैद्यकीय मदत मिळाली असती तर संगीता यांचे प्राण वाचले असते, या भावनेने संपूर्ण पाड्यात तीव्र संताप आणि हळहळ पसरली होती.रुग्णवाहिका न पोहोचल्याने घडलेला अनर्थ घडला होता.

प्रशासकीय अनास्थेमुळे स्वतःची पत्नी गमावलेल्या तुळशीराम गेडाम यांनी केवळ अश्रू ढाळत न बसता आदिवासी दिनी श्रमदानाचा निर्धार करून ठोस कृती करण्याचे ठरवले. आपल्यावर ओढवलेला हा दुःखाचा डोंगर गावातील इतर कोणत्याही कुटुंबावर येऊ नये म्हणून त्यांनी ग्रामस्थांची बैठक घेतली. गावकऱ्यांनीही या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून हातात कुदळ–फावडे घेऊन रस्त्याच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. गावाला मुख्य रस्त्याशी जोडणाऱ्या १.५ किमी खडकाळ व ओबडधोबड मार्गाची दुरुस्ती, मोठे दगड फोडणे आणि माती टाकून सपाटीकरण. या कामासाठी गावकऱ्यांचा सहभाग मिळाला. गावातील महिला, वृद्ध आणि तरुणांनी रोज सकाळपासून एकत्र येत एकजुटीने श्रमदान केले.

सध्याच्या परिस्थितीत ग्रामस्थांच्या अविरत कष्टामुळे १.५ किमी रस्त्यापैकी जवळपास निम्मे (५०%) काम अल्पावधीत पूर्ण झाले असून उर्वरित कामही वेगाने सुरू आहे.

''दुसऱ्या कोणावर ही वेळ येऊ नये'' तुळशीराम गेडाम

आपल्या भावना व्यक्त करताना तुळशीराम गेडाम म्हणाले, रस्ता नसल्याने माझ्या पत्नीला वेळेवर उपचार मिळू शकले नाहीत आणि तिचे प्राण गेले. हे दुःख आणि ही पोकळी मी आयुष्यभर विसरू शकत नाही. मात्र, माझ्यासारखे दुःख गावातील इतर कोणत्याही पतीच्या, मुलाच्या किंवा कुटुंबाच्या वाट्याला येऊ नये, केवळ रस्त्याअभावी कोणाचाही नाहक जीव जाऊ नये, म्हणूनच आम्ही स्वतःच्या घामाने हा रस्ता तयार करण्याचा निर्णय घेतला आहे.

या घटनेमुळे प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले असून विकासाच्या दाव्यांमागील विदारक वास्तव समोर आले आहे. एका बाजूला स्मार्ट शहरे, डिजिटल क्रांती आणि द्रुतगती महामार्गांचे जाळे विणले जात असताना, दुसऱ्या बाजूला अवघ्या दीड किलोमीटरच्या पक्क्या रस्त्याअभावी एका मातेचा नाहक बळी जाणे, हे संपूर्ण आरोग्य व दळणवळण व्यवस्थेचे अक्षम्य अपयश आहे. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या पाठीशी तत्परतेने उभे राहणे हे कल्याणकारी राज्याचे प्राथमिक कर्तव्य असते. मात्र, जेव्हा एखाद्या दुर्गम पाड्यातील नागरिकांना आपला जीव वाचवण्यासाठी स्वतःच कुदळ–फावडे हाती घ्यावे लागतात, तेव्हा प्रशासनाची संवेदनशीलता नेमकी कुठे गहाण पडली आहे, असा संतापजनक प्रश्न निर्माण होतो.

स्वातंत्र्याचा अमृतकाळ साजरा करताना आणि देश महासत्तेच्या दिशेने वाटचाल करत असल्याच्या घोषणा होत असताना, दुर्गम भागातील वास्तव मात्र विकासाच्या सर्व दाव्यांची पोलखोल करणारे ठरत आहे. एका बाजूला स्मार्ट शहरे, डिजिटल क्रांती आणि समृद्धी महामार्गांचे जाळे विणले जात असताना, दुसऱ्या बाजूला अवघ्या दीड किलोमीटरच्या पक्क्या रस्त्याअभावी एका गरोदर मातेला वेळेवर वैद्यकीय उपचार न मिळून प्राण गमवावे लागतात, हे संपूर्ण आरोग्य व दळणवळण व्यवस्थेचे अक्षम्य अपयश आहे. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या पाठीशी तत्परतेने उभे राहणे हे कल्याणकारी लोकशाही राज्याचे प्राथमिक कर्तव्य असते. मात्र, जेव्हा एखाद्या दुर्गम पाड्यातील नागरिकांना केवळ जीव वाचवण्यासाठी शासकीय यंत्रणेच्या प्रतीक्षेत न राहता स्वतःच कुदळ–फावडे हाती घेऊन रस्ता तयार करावा लागतो, तेव्हा प्रशासनाची संवेदनशीलता आणि उत्तरदायित्व नेमके कुठे गहाण पडले आहे, असा संतप्त सवाल उपस्थित होतो. ही केवळ एका कुटुंबाची वैयक्तिक हानी नसून, मूलभूत सुविधा देण्यास असमर्थ ठरलेल्या संपूर्ण शासकीय व्यवस्थेवर लागलेले मोठे प्रश्नचिन्ह आहे.

वर्षानुवर्षे कागदावर आखल्या जाणाऱ्या आदिवासी विकास योजना, मंजूर होणारा कोट्यवधी रुपयांचा निधी आणि प्रशासकीय बैठकांचा पाऊस या दुर्गम वाड्या–वस्त्यांपर्यंत प्रत्यक्षात पोहोचतच नाही, हेच या विदारक घटनेने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. घोडणकप्पीच्या ग्रामस्थांनी आणि स्वतःच्या पत्नीला गमावलेल्या पतीने दाखवलेले हे स्वावलंबन, धैर्य आणि एकजूट नक्कीच कौतुकास्पद आहे; मात्र ते प्रशासनाच्या टोकाच्या निष्क्रियतेवर आणि संवेदनशून्यतेवर ओढलेले सर्वात मोठे ताशेरेही आहेत. नागरिकांनी श्रमदानातून उभा केलेला मार्ग हा केवळ तात्पुरता उपाय ठरू शकतो, तो प्रशासनाला आपल्या मूळ जबाबदारीतून कधीही मुक्त करू शकत नाही. डिजिटल भारताच्या गप्पा मारत असताना अशा वीस घरांच्या वस्त्या अजूनही प्राथमिक रस्त्यासाठी आणि जीवनरक्षक आरोग्य सेवेसाठी तरसत राहणे ही यंत्रणेसाठी अत्यंत क्लेशदायक बाब आहे. त्यामुळे शासनाने या घटनेची तातडीने गंभीर दखल घेऊन, कागदावरील विकास जमिनीवर उतरवत या दुर्गम भागांत बारमाही पक्के रस्ते, नियमित दळणवळण आणि तत्पर आरोग्य सुविधांची कायमस्वरूपी सोय करणे ही काळाची तातडीची गरज आहे.

# देवर्षी नारद पत्रकारिता पुरस्कार २०२६ जाहीर

## श्रीधर लोणी, अंजली खमितकर, मयुरेश प्रभुणे आणि मोनेश शेलार यांचा सन्मान

**ज्योतिर्मय साहित्य**




पुणे – विश्व संवाद केंद्र आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या वतीने माध्यम क्षेत्रात उल्लेखनीय कार्यासाठी दरवर्षी देण्यात येणारे आद्य पत्रकार देवर्षी नारद पत्रकारिता पुरस्कार २०२६ जाहीर झाले आहेत. यंदा महाराष्ट्र टाइम्सच्या पुणे आवृत्तीचे संपादक श्रीधर लोणी यांना ज्येष्ठ पत्रकार पुरस्कार, तर सकाळचे विशेष बातमीदार मयुरेश प्रभुणे आणि प्रभातच्या वरिष्ठ बातमीदार अंजली खमितकर यांना आश्वासक पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाला आहे. तसेच सोशल मीडियाच्या प्रभावी वापरासाठी मोनेश शेलार यांना सन्मानित करण्यात येणार आहे. विश्व संवाद केंद्राचे अध्यक्ष अभय कुलकर्णी आणि डीईएसच्या नियामक मंडळाचे कार्यवाह आनंद काटीकर यांनी पत्रकार परिषदेत या पुरस्कारांची घोषणा केली. यावेळी डीईएसचे नियामक मंडळाचे सदस्य मिलिंद कांबळे उपस्थित होते.

येत्या शनिवारी (ता. २२) सकाळी ११ वाजता फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ॲम्फी थिएटरमध्ये हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडेल. दिल्लीतील लेखक, बस्तरचे रहिवासी तथा नक्षलवादाचे अभ्यासक राजीव रंजन प्रसाद यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील. या सोहळ्यात राजीव रंजन प्रसाद हे नक्षलवादी चळवळ– काल आणि आज या विषयावर विशेष व्याख्यान देणार आहेत.

विश्व संवाद केंद्राचे अध्यक्ष अभय कुलकर्णी यांनी सांगितले की, देवर्षी नारद यांच्या नावाने दरवर्षी दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांचे हे १४ वे वर्ष आहे. पत्रकारितेतील सातत्यपूर्ण विश्लेषणात्मक लिखाण आणि व्यासंगी अभ्यासक म्हणून श्रीधर लोणी यांना ज्येष्ठ पत्रकार पुरस्कार (३१ हजार रुपये रोख आणि देवर्षी नारदांची मूर्ती) देऊन गौरविण्यात येणार आहे.

विज्ञान, हवामान आणि पर्यावरण पत्रकारितेतील अग्रगण्य योगदानाबद्दल मयुरेश प्रभुणे, तर धडाडीच्या बातमीदारीबद्दल अंजली खमितकर यांना आश्वासक पत्रकारिता पुरस्कार (प्रत्येकी २१ हजार रुपये रोख आणि मूर्ती) प्रदान करण्यात येईल. तसेच, समाजमाध्यमांवर प्रेक्षकांना भावणारी आणि रुचणारी तथ्यात्मक मांडणी केल्याबद्दल मोनेश शेलार यांचा गौरव (२१ हजार रुपये रोख आणि मूर्ती) करण्यात येणार आहे.

पत्रकार परिषदेत आनंद काटीकर यांनी डीईएस पुणे विद्यापीठाच्या उपक्रमांची माहिती दिली. सध्या माध्यम क्षेत्रात केवळ बातमीदारीच नव्हे, तर प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांसाठी आवश्यक असलेल्या फोटोग्राफी, व्हिडिओग्राफी, वेब डिझायनिंग, ग्राफिक डिझायनिंग अशा विविध अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा कल वाढल्याचे त्यांनी नमूद केले. या पुरस्कार वितरण सोहळ्यास माध्यम क्षेत्रातील प्रतिनिधींसह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विश्व संवाद केंद्र आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या वतीने करण्यात आले आहे.

# संत तुकाराम प्राथमिक विद्यालयात ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर – संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूल, डॉ. आंबेडकर नगर, सिडको एन–७, छत्रपती संभाजीनगर येथे भारताचा स्वातंत्र्य दिन देशभक्तीपूर्ण व उत्साहाच्या वातावरणात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाशराव सोनवणे, सचिव संगीता खिल्लारे, संचालिका लक्ष्मीताई गायकवाड, नगरसेविका भारतीताई सोनवणे, युवा नेते महेंद्र सोनवणे तसेच ज्येष्ठ नागरिक लक्ष्मण गायकवाड प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक संदीप सोनवणे होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या विद्यार्थ्यांनी लेझीम पथकासह आंबेडकर नगर, गौतम नगर, जाधववाडी व फुलेनगर परिसरातून देशभक्तीपर घोषणा देत प्रभातफेरी काढली. या प्रभातफेरीत परिसरातील नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शाळेच्या क्रीडांगणावर सर्व महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन संचालिका लक्ष्मीताई गायकवाड व सचिव संगीता खिल्लारे यांच्या हस्ते करण्यात आले. ध्वजपूजन मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांनी केले, तर नगरसेविका भारतीताई सोनवणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या आकर्षक स्वागत नृत्याने झाली. भरतनाट्यमचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थी आदर्श आत्माराम पवार याने आपल्या कलाविष्कारातून उपस्थितांची मने जिंकली. यानंतर विद्यार्थ्यांनी लेझीम, डंबेल्स, रिंग कवायत, देशभक्तीपर गीत गायन, देशभक्तीपर नृत्य आदी विविध कार्यक्रम सादर केले. विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनानिमित्त आपले मनोगतही व्यक्त केले. **समरीन शेख, आयशा पठाण, प्रज्ञा मिसाळ, सम्राट भांबळे, सायमा शेख, प्रेमराज चाबुकस्वार, रेशमा शेख, मोनिका मगरे, पायल मिसाळ, शिवानी साळवे, रेखा दाभाडे यांच्यासह एकूण २६ विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

इयत्ता पहिलीची विद्यार्थिनी कीर्ती आढाव हिने भारतमातेची वेशभूषा साकारून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. तसेच स्वातंत्र्यलढ्यात योगदान देणाऱ्या विविध वीरांगनांच्या वेशभूषेत इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थिनी उपस्थित राहिल्या. विविध देशभक्तीपर नृत्यांनी कार्यक्रमात विशेष रंगत आणली.

**मान्यवरांचे मार्गदर्शन**

युवा नेते महेंद्र सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देताना स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागामुळे आपल्याला स्वातंत्र्य मिळाले असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी शिक्षणाला प्राधान्य देऊन आपल्या कुटुंबाचे, शाळेचे व परिसराचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच परिसरातील नागरिक व पालकांच्या विविध अडचणी समजून घेत भविष्यात परिसराच्या विकासासाठी आवश्यक ती कामे करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाशराव सोनवणे यांनी आपल्या मार्गदर्शनातून स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी असंख्य स्वातंत्र्यसैनिकांनी केलेला संघर्ष आणि त्याग विद्यार्थ्यांनी सदैव स्मरणात ठेवावा, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेऊन जबाबदार नागरिक बनावे, समाजात बंधुभाव, समता आणि एकतेची भावना जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले. शाळेतील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच विविध कला, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देताना स्वातंत्र्याचा खरा अर्थ समजून घेण्याचे आवाहन केले. देशाने आपल्याला दिलेल्या स्वातंत्र्याचा योग्य उपयोग करून प्रत्येक विद्यार्थ्याने शिक्षण, शिस्त, प्रामाणिकपणा आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांना आपल्या जीवनात स्थान द्यावे, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेच्या वतीने विविध उपक्रम राबविले जात असून पालकांनीही शाळेच्या प्रत्येक उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. पालकांनी स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवल्याबद्दल त्यांनी पालकांचे आभार मानले.

विद्यार्थ्यांचे विविध कलागुण पाहून उपस्थित पालक भारावून गेले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि देशभक्तीच्या वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहेबराव शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन हर्षल पगारे यांनी केले. लेझीम पथकाचे उत्कृष्ट संचलन सुनील चौधरी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी साहेबराव शिंदे, सुनील चौधरी, संजय चौधरी, किरणकुमार सोनवणे, विजय पाटील, हर्षल पगारे, रत्नमाला घोरपडे, आडवे बागुल व सुनीता शेजुळ** यांनी परिश्रम घेतले.

# अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे प्रणेते -डॉ.नरेंद्र दाभोळकर

**ज्योतिर्मय साहित्य**



डॉ.नरेंद्र अच्युतराव दाभोळकर हे एक मानवतावादी थोर विचारवंत होते.जात, धर्म, लिंग, वंश व जन्म स्थान बाजूला सारून सर्वांना समानतेने वागवावे,या विचाराचे ते पाईक होते. त्यांनी निसर्गावर व प्राणीमात्रांवर सुद्धा दया करावी. असे आदर्श विचारांनी ते भारलेले ज्ञानवंत व्यक्ती होते. आणि उत्तम कबड्डीपटू होते. त्यांना सामाजिक कार्याची मनापासून खूप आवड होती. त्यांनी जातीभेद सांप्रदायिक भेद, वंश भेद,वसाहतवाद, प्रांतवाद यांना कडाडून विरोध केला. समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा, प्रथा, जादूटोणा, काळी जादू , भूत, पिशाच्च, अंगात येणे, बुवाबाजी, चमत्कार या सर्व अंधश्रद्धे वर त्यांनी कोरडे ओढले. वाईट कृत्यावर बंधन घालण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे कार्य हाती घेतले त्यांनी परिवर्तन नावाची एक सामाजिक संस्था ही स्थापन केली. विवेक नावाचे साप्ताहिक सुरू करून लोकांच्या मनात जागृती करण्याचा प्रयत्न केला.

अशा या बुद्धिवादी, विवेकवादी, विज्ञानवादी विचारवंताचा जन्म सातारा जिल्ह्यातील माहुली या गावी १ नोव्हेंबर १९४५ रोजी झाला. त्यांचे शिक्षण मिरज येथील शासकीय महाविद्यालयात झाले, तिथेच त्यांना एमबीबीएस ची पदवी मिळाली.काही वर्षे डॉक्टर म्हणून त्यांनी जनसामान्यांची सेवा केली. आणि त्यांनी आपला मोर्चा सामाजिक क्षेत्राकडे वळवला. पिकामध्ये जास्त गवत झाल्यानंतर पिकांना ते वाढू देत नाही. तसे समाजामध्ये अंधश्रद्धा, रूढी परंपरा पसरल्या की समाज हा दुर्बल होतो. त्यामुळे समाजातील विवेकवादी विचार लोप पावत असतात. समाजातून प्रबोधनात्मक विचारांच्या विकासाची मशागत करावी लागते. त्यासाठी उत्कृष्ट व दर्जेदार शिक्षणाची गरज असते. शिक्षणाशिवाय तरुणोपाय नाही. म्हणून त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राष्ट्रपिता महात्मा गांधी या समाज सुधारकांनी समाजासाठी केलेल्या कार्याची माहिती आपल्या समाज प्रबोधनातून करून देत असत.









## जात्यावरच्या ओव्या......

भरला बाजार
घेते भातंक आवडीन
शेव मुरमुरे पापडी
गोड तोंड जिलेबीन ||८०३||

भरला बाजार
अन् खिसा झाला रिता
संसाराचा गाडा
बाप ओढत होता ||८०४||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ६३

ज्योतिर्मय साहित्य

**अती मूढ त्या दृढ बुद्धी असेना ।**
**अती काम त्या राम चित्ती वसेना ।**
**अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा ।**
**अती विषयी सर्वदा दैन्यवाणा ।६४।**

अर्थ : मूढ म्हणजे मूर्ख मनुष्य. अशा व्यक्तीला आपले हित कशात आहे हे कळत नाही. त्याच्याजवळ साहजिकच दृढ बुद्धी म्हणजे निश्चयाचा अभाव असतो. ज्याच्या मनामध्ये विषयवासना मोठ्या प्रमाणात घर करून असतात, त्याच्या मनात साहजिकच भगवंताला स्थान मिळणे शक्य नसते. अती लोभी माणसाला शेवटी क्षोभाला म्हणजे क्रोधाला सामोरे जावे लागते. विषय विकारांच्या अती अधीन झालेला माणूस लाचार आणि दीनवाणा असतो.



विवेचन : अति सर्वत्र वर्जयेत असे संस्कृत वचन आहे. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक झाला की तो सर्वनाशाला कारणीभूत होतो. एखादी गोष्ट आरोग्याला हितकारक जरी असली तरी तिचा अतिरेक झाला तर तो घातक ठरतो. उत्तम प्रकृतीसाठी शरीराला व्यायाम आवश्यक असतो. पण त्याचा अतिरेक झाला तर अंतिमतः हानीच होते. त्याप्रमाणे सर्वच गोष्टींचे आहे. अती खाणे, अती बोलणे, अती निद्रा, अती उर्मटपणा अशी कोणतीही गोष्ट अती झाली की नुकसानच होते.अती तिथे माती असे आपण म्हणतो ते यामुळेच.




कामवासना किंवा विषय सेवन आपल्या आयुष्यात जेवढे आवश्यक असते, तेवढे करण्याची परवानगी आपल्याला आपली संस्कृती देते. त्यासाठी एक विशिष्ट चौकट आपल्या संस्कृतीने आखून दिलेली आहे. त्यासाठी विवाह संस्कार आहे. तात्पर्य एका मर्यादेत विषय सेवन शास्त्रास मान्य आहे. परंतु विषय सुखाच्या अधीन होऊन त्यापलीकडे दुसरे काहीच न दिसणे हे तामसी वृत्तीचे लक्षण आहे. पशुसुद्धा आवश्यक तेवढाच कामवासनेचा आधार घेतात. प्रजोत्पादन हे त्यांचे उद्दिष्ट असते. परंतु माणूस मात्र कोणतीही मर्यादा पाळत नाही. कामातुराणां न भयं न लज्जा असे एक संस्कृत वचन आहे. सध्या विविध माध्यमांमुळे माणसांच्या वासना भडकवल्या जातात. त्यांचा अतिरेक झाला तर काय होते याचे प्रत्यंतर आपल्याला रोजच्या बातम्या पाहिल्या तरी येते. **(क्रमशः)**

## ॥ अभंग-माधव ॥



माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630



------ भजन महिमा ------

करिता भजन । मिळे ब्रह्मानंद ।
टाळ नि मृदुंग । होता एक ॥१॥
भजन म्हणजे । ईश गुणगान ।
ते नामस्मरण । सदा करा ॥२॥
भजनाने होई । स्वमन प्रसन्न ।
भास्करा समान । ऊर्जा लाभे ॥३॥
भजन करते । बुद्धीचा विकास ।
दुःख ते लयास । जाऊ लागे ॥४॥
भलते सलते । मनीचे विचार ।
जाती लयी पार । भजनाने ॥५॥
भजनाने होती । सात्विक संस्कार ।
चित्ता मिळे फार । समाधान ॥६॥
माधव हा म्हणे । करूया भजन ।
गाऊ गुणगान । ईश्वराचे ॥७॥

## नाम घेतल्याने आपले अवगुण कळून येतील



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

जगातली अनेक साधने जरी पाहिली तरी त्या सर्व साधनांची पहिली पायरी ही, की मनुष्याला त्याचे अवगुण दिसू लागणे. जसजसे साधन वाढत जाईल तसतसे आपल्यातले अवगुण प्रखररूपाने दिसू लागतात, आणि त्या अवगुणांचा पुढे डोंगरच वाटू लागतो, ''हे परमेश्वरा ! इतक्या अवगुणांनी मी भरलेला असताना, तुझे दर्शन व्हावे अशी मी कशी अपेक्षा करू ? एवढ्या पर्वतप्राय अवगुणांच्या राशीतून मला तुझे दर्शन होईल हे कालयत्री तरी शक्य आहे का ?'' असे वाटू लागते. साधन करण्यापूर्वी, रागीट माणूस कधी त्या रागाची खंत बाळगत नाही; किंबहुना, तो अवगुण आहे हे मुळी त्याला पटतच नाही. तो म्हणतो, ''व्यवहारात असा दरारा पाहिजेच; त्याशिवाय कसे चालेल ?'' एक साधक मला म्हणाला की, ''अलीकडे मला फार राग येऊ लागला आहे.'' वास्तविक, तो राग आताच येऊ लागला असे नसून पूर्वीपासूनच त्याच्याजवळ होता, परंतु साधन करू लागल्यापासून त्याला जाणीव होऊ लागली आहे, किंवा क्रोध वाईट आहे हे आता त्याला कळू लागले आहे, इतकेच ! एक लग्नाचा मुलगा होता. त्याने बऱ्याच मुली पाहिल्या, पण एकही त्याच्या मनास येईना. त्याचे आईवडील कंटाळून त्याला म्हणाले, ''तुला मुलगी पसंत पडू दे, मग आम्ही पुढचे काय ते ठरवू.'' ते काही मुलगी पाहायला बरोबर जात नसत. त्या मुलाची मोठी बहीण होती तीच त्याच्याबरोबर जात असे. एका ठिकाणाहून मुलगी पाहून आल्यावर मोठ्या बहिणीने त्याला विचारले, ''कशी वाटली रे तुला ?'' त्यावर तो म्हणाल, ''नाही बुवा आपल्याला पसंत.'' मोठी बहीण चाणाक्ष होती; तिने फक्त त्याच्या तोंडासमोर आरसा धरला आणि विचारले, ''या प्रतिबिंबापुढे कशी काय वाटते ?'' तेव्हा स्वतःचे आणि मुलीचे रूप त्याच्या ध्यानी आले, आणि तो म्हणाला, ''पुष्कळ बरी आहे.'' सारांश, जिथपर्यंत आपल्याला स्वतःचे खरे दर्शन होऊ शकत नाही, तिथपर्यंत दुसऱ्यांचे अवगुणच आपल्याला दिसतात. आपल्याला दुसऱ्याचे जे काही अवगुण दिसतात, त्यांचे बीज आपल्यातच आहे, हे माणसाने ठाम ओळखले पाहिजे. तेव्हा, दुसऱ्याचे अवगुण पाहण्याची वृत्ती आपण प्रथम टाकून दिली पाहिजे. दुसऱ्याचे अवगुण पाहणे हा साधा नेहमीचा व्यवहार आहे, तो परमार्थ नव्हे. खरा परमार्थी जो असतो तो सतत आत्मपरीक्षण करीत असतो. त्याला दुसऱ्याचे अवगुण दिसतच नाहीत; त्याला आपल्याच अवगुणांचे इतके दर्शन होते की, त्या मानाने इतर सर्वजण त्याला परमेश्वररूपच भासतात; आणि हाच खरा परमार्थ. आत्मपरीक्षा करून स्वतःमधील अवगुणांच्या बीजाचे उच्चाटन करणे हे एक मोठे साधन आहे; आणि हे साधण्यास नामस्मरणासारखे दुसरे साधन नाही.

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

## आपले सण आपले उत्सव नागपंचमी (भाग तीन)

आपल्या मुलांना बोलावून कद्रुने त्यांना आपल्या पैजेची कथा सांगितली. त्यांना म्हणाली की, तुम्ही घोड्याच्या केसा इतके सूक्ष्म होऊन, त्याच्या केसात मिसळून जा. म्हणजे घोड्याचे केस काळे दिसतील. म्हणजे मी पण जींकेन, व विनिता माझी दासी होईल.

आईचे हे बोलणे ऐकून नाग मुले म्हणाली, हे कपट आम्ही मुळीच करणार नाहीत. मग तुझी हार होवो, की जीत. ज्या मुलांवरील विश्वासाने आपण पैज लावली, त्यांनीच आज्ञा ऐकली नाही, म्हणून कद्रू संतापली, व तिने मुलांना शाप दिला की, पांडवांच्या वंशात उत्पन्न राजा जन्मेजय हा सर्प यज्ञ करील. तेव्हा त्या अग्नीत तुम्ही सारे भाजले जाल. एवढे बोलून कद्रू थांबली.

नाग गण आपल्या आईने दिलेल्या शाप वाणीने खूप धास्तावले, व वासुकी नागाला सोबत घेऊन, ते ब्रह्म देवाकडे गेले. वासूकिने त्यांना सर्व वृत्तांत कथन केला. त्यावर ब्रह्मदेव म्हणाले, वासूकी तू चिंता करू नकोस. ऐक " यायावर वंशात एक जरत्कारू नावाचा तपस्वी ब्राम्हण होईल. त्याचे सोबत तुम्ही आपल्या जरत्कारू नावाच्या बहिणीचा विवाह लावून द्या, आणि ती बहीण जे म्हणेल, त्याचे पालन करा. त्या बहिणीला अस्तीक नावाचा एक विख्यात पुत्र होईल. तो जन्मे जयाच्या सर्प यज्ञाला थांबवील,आणि तुम्हा नागांचे रक्षण करील. ब्रह्मदेवाचे वचन ऐकून वासुकी अतिशय आनंदीत झाला. ब्रह्मदेवाला प्रणाम करून ही मंडळी तेथून बाहेर पडली.

हीच गोष्ट भगवान श्रीकृष्णाने युधिष्ठीराला सांगितली होती की, आज पासून शंभर वर्षांनी सर्प यज्ञ होईल. ज्यात भयंकर विषारी साप जळून मरतील व आस्तिक नावाचा ब्राह्मण नागांचे रक्षण करील. ब्रह्म देवाच्या वरा मुळे अस्तीक मुनींनी हे कार्य केले. तो दिवस नागपंचमीचा होता. पंचमी तिथी नागांना अत्यंत प्रिय आहे, आणि त्यांना आनंद देणारी आहे. त्या दिवशी नाग लोकात विशेष उत्सव असतो. पंचमी तिथीला जे व्यक्ती नागाला दुधाने स्नान घालतील, त्यांच्या कुळात वासुकी, तक्षक, कालीय, मणीभद्र ऐरावत, धृतराष्ट्र, कर्कोटक आणि धनंजय हे सर्व नाग अभय दान देतात. त्यांच्या कुळात सर्प भय नाही. नाग माता कद्रूच्या शापाने नाग लोक जळत होता, त्यामुळे त्या दाहाची व्यथा दूर करण्यासाठी, नागपंचमीच्या दिवशी नागाला दुधाने स्नान घालण्याची प्रथा पडली आहे. यामुळे सर्प भय रहात नाही.

पंचमीच्या दिवशी नागाची पूजा करून प्रार्थना करायला हवी की, हे नाग, जमिनीवर, आकाशात, स्वर्गात, सूर्य किरणात, सरोवरात, आडात, विहिरीत, तलावात इत्यादी ठिकाणी राहतात ते सर्व नाग आमच्यावर प्रसन्न होवोत. आम्ही त्यांना वारंवार नमस्कार करतो. (क्रमशः)

## ॥ संजय उवाच... ॥



@संजय काव्या पुणे 7743918559

✍️ निष्ठा
निष्ठा म्हणजे विश्वास किंवा प्रेम, एखाद्याची निष्ठा मिळावीण्यासाठी त्याचा विश्वास जिंकावा लागतो, निष्ठा सहजासहजी मिळत नसते. व ती टिकविणे त्याहून मोठी कसौटी आहे.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍️वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### "जीवन किती जगावे??"

मित्रांनो, शीर्षकावरून अंदाज लावला तर आपण अजून गोधंळात पडू कारण एक तर जीवन जगणे कुठे हातात आहे,पण याची दुसरी बाजू म्हणजे "सर्व जीवनात करून झाल्यावर काय? म्हणजे बघा, वयाच्या 80 व्या वर्षापर्यंत जवळपास सर्वांचे सर्व करून झालेले असते, असे म्हणू गरीब श्रीमंत असो, घरदार-मुलाची सोय, बेगमी बस.. पण नंतरही आसक्ती, इच्छा काळजी फिकीर करावी का? नाही.आपणास काय वाटते, वाचकहो, मला कंमेट करा. उदा.अगदी 22 व्या वर्षी ह्यानेश्वर महाराज वयाच्या 39 व्या वर्षीच कार्य संपल्यावर गेले. ईश्वर प्रत्येकाला काही तरी जीवन कार्य करण्यास पाठवित असतो. मग देशभक्ती, सेवा, कौटुंबिक सामाजिक कार्य, मदत, व्यवसाय तो पार पाडत असतो. मग ते काम पूर्ण झाल्यावर जीवनाचे काही प्रयोजन ऊरत नाही!खरे तर जीवन सुंदरता तिथपर्यंतच असते. पण हे विसरून जो जीवनाला पुढे ओढत असतो तसे जीवन नश्वर आहे, हे कलत असूनही त्याबद्दल भ्रम, मोह वा आसक्ती नको किंवा माझ्यानंतर कुटुंबाचे काय होईल, आनंदाने मृत्यूला सामोरे जाण्यास सर्व बाजूंनी सकारात्मक वातावरण असताना कोठे थांबायचे याचा विचार का दूर करावा? बरोबर पटत ना? आज थांबतो स्वस्थ राहा मस्त राहा सुख दुःखाचे तरंग वाचत राहा. सुप्रभात.

## ॥ श्री दत्त महिमा ॥



लेखन सेवा - योगीराज (नितीन) डोळे
आद्यपीठ वरद दत्त संस्थान
श्री क्षेत्र राक्षसभुवन ता.गेवराई जि. बीड



## बजरंग बली की जय पवन सुत हनुमान की जय

ज्योतिर्मय साहित्य

रामायण कथाही हनुमंताशिवाय पूर्णत्वात येऊ शकत नाही प्रभू रामचंद्राचा व दत्त संप्रदायाचा मिलाप आपण मागील कथेमध्ये पाहिला तोच संदर्भ या वरददत्त संस्थानशी जोडला आहे

रामायणातील कथानकामध्ये रावणाचा मामा मरीची राक्षस याने सुवर्णमृगाचे रूप घेऊन दंडकारण्यामध्ये सीता मातेच्या हरणाप्रसंगी महत्त्वाची भूमिका बजावली होती त्यानेच लक्ष्मणास सितारक्षण कर्तव्या पासून दूर करण्यासाठी मायावी रूप घेतले होते त्यामुळे सीतामाता आश्रमामध्ये एकटी राहिली होती त्याच सुवर्णमृगाचा प्रभू रामचंद्रांनी वध करून ज्या स्थानी त्या मृगाचे शीर पडले ते आज टोका नावाने प्रसिद्ध आहे व ज्या स्थानी त्या मृगाचे धड पडले ते स्थान कायगाव आजही ते क्षेत्र कायगाव टोका या नावाने प्रसिद्ध आहे हे स्थान अहिल्यानगर व संभाजीनगर जिल्ह्याच्या सीमेवर प्रवरा व गोदावरी नदीच्या संगमावर आहे या ठिकाणचे एक पश्चिमा भिमुख हनुमान मंदिरातील हनुमान प्रभू रामचंद्र यांच्या सोबत गोदातीरावरील राक्षस भुवन क्षेत्र आले



त्यांची मूर्ती आजही वरद दत्त संस्थान मध्ये नित्य पूजेत विराजित आहे साधारणतः हनुमानाची मूर्ती गावाच्या शिवेवर किंवा पटांगणामध्ये असते कोणाच्याही घरामध्ये मूर्ती आढळत नाही म्हणून जनमानसात एक म्हण प्रचलित आहे गाव जले हनुमान बाहर हनुमंत राय ग्रामदैवत असते मात्र कोणाचेही कुलदैवत असल्याचे आढळत नाही

मात्र या संस्थांन मधे हनुमानाची मूर्ती घरामध्ये विराजित आहे साधारणतः हनुमानाची मूर्ती गदाधारी असते मात्र या स्थानी हनुमानाची मूर्ती दोन्ही कर जोडून उभी आहे जवळ गदा नाही अशी ही दुर्मिळ मूर्ती याच स्थानी आढळते अगदी निशस्त्र हनुमानाची मूर्ती दुर्मिळ स्वरूपात येथे आहे म्हणूनच म्हणूया बजरंग बली की जय पवनसुत हनुमान की जय!

## प्रभातपुष्प

षटकोळी माझी
संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### आनंदाचे डोही...

आम्ही सर्व आहोत
आनंदाचे डोही छान
साहित्याचे खरे वारकरी
शब्दांची गुंफूनी माळ
भाव मांडतो मनातले
पुस्तकरुपी गुरुचे पूजारी

आनंदाचे डोही आम्ही
सुख देवू,घेवू
द्वेषभाव नको मनी
मदत करु एकमेकांना
वेदना दूर करता
आनंद नांदो जीवनी

# "असंख्य पिढ्यांच्या संगोपनाचे दायित्व शिक्षकांच्या हाती" -प्रा. वा. ना. आंधळे

## आदर्श प्राथमिक व माध्यमिक शाळा, पिंप्री येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**ज्योतिर्मय साहित्य**

पिंप्री – "शिक्षक हा देशाच्या सद्यस्थितीतील मोठा आधार असून राष्ट्रभक्ती, समाजप्रेम, मानवता, सहिष्णुता, सकारात्मकता आणि एकात्मता या मूल्यांची रुजवात शिक्षकच करू शकतो. त्यामुळे शिक्षकाची भूमिका ही आईच्या भूमिकेसारखी असणे आवश्यक आहे," असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवी प्रा. वा. ना. आंधळे यांनी केले. आदर्श प्राथमिक व माध्यमिक शाळा, पिंप्री येथे आयोजित स्वातंत्र्य दिन सोहळ्यात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते.

प्रा. आंधळे पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात शिक्षक व पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मोबाईलचा अतिरिक्त वापर विद्यार्थ्यांच्या अध्ययनासाठी घातक ठरू शकतो. त्यामुळे शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या वापरावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. अध्ययन हेच विद्यार्थ्यांचे प्रमुख उद्दिष्ट असावे आणि यशप्राप्तीचे ध्येय समोर ठेवून त्यांनी सक्षम राष्ट्र उभारणीत योगदान द्यावे. यावेळी त्यांनी संस्थेचे व शिक्षकांचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे कौतुक केले.

आदर्श प्राथमिक व माध्यमिक शाळा, पिंप्री येथे १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. वा. ना. आंधळे होते.

स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांची गावातून भव्य रॅली काढण्यात आली. देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी मनोगत, समूहगीत गायन, देशभक्तीपर गीतांवरील नृत्य आदी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेले मानवी मनोरे विशेष आकर्षण ठरले.

यावेळी माध्यमिक शालांत परीक्षा इयत्ता दहावी तसेच शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन गौरव करण्यात आला. तसेच आंतरशालेय स्पर्धा, गणित जत्रा आणि रांगोळी स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

**प्रा. वा. ना. आंधळे यांचा विशेष साहित्यिक गौरव**

प्रा. वा. ना. आंधळे यांच्या कवितासंग्रहावर मराठवाडा विद्यापीठातील श्री. ज्ञानसागर संतोष सूर्यवंशी यांनी पीएच.डी. संशोधन केले आहे. तसेच कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्रा. आत्माराम चिमकर यांनीही त्यांच्या साहित्यावर पीएच.डी. संशोधन केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय साहित्यिक योगदानाचा गौरव म्हणून वेदमाता गायत्री बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने प्रा. वा. ना. आंधळे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून संस्थेच्या आवारात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यामधून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमास वेदमाता गायत्री बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अण्णासो मधुकर रामजी चौधरी, उपाध्यक्ष श्री. प्रमोद चौधरी, सचिव श्री. विनोद चौधरी, श्री. डी. एन. पाटील सर, डॉ. पिंगळे सर, श्री.




विजय पाटील, भोदचे सरपंच श्री. संदीप पाटील, सौ. वैशाली चौधरी मॅडम (मुख्याध्यापिका, आदर्श प्राथमिक शाळा), श्री. संदीप सपकाळे (मुख्याध्यापक, आदर्श माध्यमिक शाळा) तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक, पालकवर्ग व शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक–शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस. के. शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन आर. एस. पाटील यांनी मानले.

विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, साहित्यिक व्यक्तिमत्त्वाचा सन्मान, सांस्कृतिक कार्यक्रम आणि प्रेरणादायी अध्यक्षीय मनोगत यामुळे आदर्श प्राथमिक व माध्यमिक शाळा, पिंप्री येथील स्वातंत्र्य दिन सोहळा अविस्मरणीय ठरला.

# डॉ.मधुसूदन घाणेकर यांच्या सबकुछ.मधुसूदन एकपात्री. कार्यक्रमाच्या ८५,००० व्या प्रयोगास उत्स्फूर्त प्रतिसाद

**ज्योतिर्मय साहित्य**



पुणे – तितिक्षा इंटरनॅशनल या संस्थेतर्फे नुकत्याच आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय एकपात्री जीवनगौरव पुरस्काराचे मानकरी सर डॉ.मधुसूदन घाणेकर यांचा नुकताच सबकुछ मधुसूदन ह्या विश्व विक्रमी एकपात्री कार्यक्रमाच्या ८५,००० व्या विश्व विक्रमी प्रयोगास उपस्थित रसिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

"डॉ.मधुसूदन घाणेकर यांनी जिथे रसिक तिथे कार्यक्रम अशी व्यासपीठाची व्याख्याच बदलून १९६३ पासून भारतासह नेपाळ, न्यूझीलंड, श्रीलंका, सिंगापूर, चीन,रशिया मलेशिया, थायलंड, दुबई, मॉरिशस, व्हिएटनाम, कंबोडिया, इंडोनेशिया, मस्कद, हॉगकॉग आदि २० देशात चालता बोलता हजारो प्रयोग स्वखर्चाने

निरपेक्षपणे करुन रसिकांना दिलासा दिला. ५०,००० हून अधिक विनामूल्य प्रयोग दिव्यांग आणि वंचितांसाठी केले. हजारो प्रयोग करोना..टायफॉईड–कावीळ तसेच

बायपास सर्जरी अशा आजारांशी झुंज देतही त्यांनी केले आहेत. डॉ.मधुसूदन घाणेकर यांनी विविध क्षेत्रात ३०९ विश्वविक्रम केले आहेत....पण याहीपेक्षा त्यांच्यातील

माणूसपण हे नक्कीच अधिक श्रेष्ठ ठरले आहे " असे तितिक्षा इंटरनॅशनलच्या संस्थापक, अध्यक्ष प्रिया प्रमोद दामले यांनी डॉ.मधुसूदन घाणेकर यांना मानपत्र प्रदान करताना प्रतिपादन केले.

याप्रसंगी डॉ.मधुसूदन घाणेकर संपादित डहाळी ह्या विश्वविक्रमी अनितकालिकाचा ११६५ विशेषांक तसेच प्रिया दामले लिखित डॉ.मधुसूदन घाणेकर यांच्या सबकुछ मधुसूदन ह्या एकपात्री कार्यक्रमाचा ८५,००० वा प्रयोग ह्या पुस्तकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.

याप्रसंगी रंगकर्मी आणि साहित्यिक सुहास वाळुंजकर, ज्येष्ठ शास्त्रज्ञ काशिनाथ देवधर, ज्येष्ठ कवी गुरुदत्त वाकदेकर तितिक्षा इंटरनॅशनल संस्थेच्या बालसचिव एम अजया, मधुरंग संस्थेच्या उपाध्यक्ष मेघना मधुसूदन घाणेकर, ज्येष्ठ साहित्यिक वसुधा इंटरनॅशनल संस्थेच्या संस्थापक आणि अध्यक्ष वसुधा नाईक, डॉ.राजेन्द्र भवाळकर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या नीला विद्वांस, मधुकर्णिका फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष मधुकर्णिका सासवडे, कवयित्री शैलजा सोमण, दीपाराणी गोसावी, कवी विजय सातपुते, विनोद अषटूळ, नंदकिशोर गावडे, प्रा.शरदचंद्र काकडे, गौरव पुंडे आदि मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुवर्णा जाधव यांनी केले.

प्रिया दामले यांनी प्रास्ताविक, अतिथी स्वागत आणि आभार प्रदर्शन केले. उत्तरार्धात डॉ.मधुसूदन घाणेकर यांनी त्यांचा सबकुछ मधुसूदन ह्या एकपात्री कार्यक्रमाचा

८५,००० वा प्रयोग सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.

# प्रकाश सोनवणे यांचा आज राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते सेवागौरव

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर – ज्ञानसंदिप शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापक प्रकाश सोनवणे यांचा सेवागौरव सोहळा उद्या, गुरुवार, २० ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता**, राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते होणार आहे. शासकीय दूध डेअरी जवळील महसूल प्रबोधिनीच्या सभागृहात हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक न्यायमंत्री तथा छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री **संजय शिरसाट** राहणार आहेत.

यावेळी ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते ज्येष्ठ पत्रकार डॉ. शेखर मगर संपादित 'वंचितांचा ज्ञानदीप' या गौरव ग्रंथाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. या ग्रंथातून प्रकाश सोनवणे यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक, सामाजिक व साहित्यिक कार्याचा गौरव करण्यात आला आहे.

'वंचितांचा ज्ञानदीप' या गौरव ग्रंथात तब्बल ६८ लेखकांनी लेखन केले असून, प्रकाश सोनवणे यांच्या कार्याचा विविध अंगांनी आढावा घेण्यात आला आहे. भारतीय दलित पँथरचे संस्थापक तथा ज्येष्ठ साहित्यिक ज. वि. पवार यांनीही या ग्रंथासाठी संक्षिप्त टिपण लिहिले आहे.

प्रा. प्रकाश सोनवणे यांनी प्रतिकूल परिस्थितीत छत्रपती संभाजीनगर शहरात शैक्षणिक संस्थेची उभारणी करून वंचित, कष्टकरी व गरजू




विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. आंबेडकरनगर व मसणतपुरा परिसरात शाळा उभारून त्यांनी ज्ञानदानाचे कार्य केले. जाधववाडी, नारेगाव, ब्रिजवाडी आदी परिसरातील झोपडपट्ट्यांमधील कामगार, श्रमिक व कष्टकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात त्यांचे मोठे योगदान आहे.

प्रकाश सोनवणे यांच्या ३८ वर्षांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा 'वंचितांचा ज्ञानदीप' या गौरव ग्रंथातून घेण्यात आला आहे. ३० जून २०२६ रोजी नियत वयोमानानुसार ते मुख्याध्यापक पदावरून सेवानिवृत्त झाले. त्यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेबद्दल या सोहळ्यात त्यांचा **मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन सपत्नीक सेवागौरव करण्यात येणार आहे.

या सोहळ्यास जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. कल्याण काळे तसेच मराठवाड्यातील शिक्षक आमदार विक्रम काळे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. ज्येष्ठ साहित्यिक तथा विचारवंत डॉ. ऋषिकेश कांबळे गौरव ग्रंथावर भाष्य करणार आहेत.

या कार्यक्रमास शिक्षण, सामाजिक व साहित्यिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती राहणार असून डॉ. शेखर मगर, अशोक कांबळे, माजी प्राचार्य विलास पाटील, वसंत राठोड, डॉ. राजेंद्र शेख, बी. बी. शिंदे, संदिप सोनवणे, अभिजित सोनवणे, किरणकुमार सोनवणे आदी उपस्थित राहणार आहेत.

**शिक्षण क्षेत्रातील योगदानाचा गौरव**

प्रकाश सोनवणे यांनी वंचित व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. त्यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेला राज्यपालांच्या हस्ते मिळणारा हा सेवागौरव हा त्यांच्या कार्याचा सन्मान असून, 'वंचितांचा ज्ञानदीप' हा गौरव ग्रंथ त्यांच्या कार्याची प्रेरणादायी नोंद ठरणार आहे.





## सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906


# विचार ते विजय

लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013



## कृतज्ञता – आनंदी जीवनाची गुरुकिल्ली

आपण आनंद कुठे शोधतो?
मोठ्या घरात... महागड्या गाडीत... पगाराच्या आकड्यात... यशाच्या शिखरावर...
पण कधी कधी आनंद आपल्या अगदी जवळ उभा असतो आणि आपण त्याच्याकडे पाहायलाच विसरतो.
कृतज्ञता म्हणजे त्या जवळच्या आनंदाला ओळखण्याची नजर. सकाळी उठल्यावर आपल्याकडे डोळे उघडण्यासाठी प्रकाश आहे, श्वास घेण्यासाठी हवा आहे, बोलण्यासाठी माणसं आहेत, चालण्यासाठी पाय आहेत, प्रेम करणारी माणसं आहेत...
पण आपण याचा विचार किती वेळा करतो?
आपल्याकडे जे आहे त्याची सवय होते आणि जे नाही त्याची कमतरता सतत जाणवत राहते.
म्हणूनच माणूस दुःखी होतो.
एका माणसाकडे छोटंसं घर होतं. घर जुनं होतं, भिंतींना तडे होते, पावसाळ्यात थोडं पाणीही गळायचं. तो रोज त्या घराची तक्रार करायचा.
एक दिवस त्याच्या शेजारी राहणाऱ्या वृद्ध माणसाचं निधन झालं.
त्याची मुलं परदेशात होती. मोठं घर होतं, पैसा होता; पण शेवटच्या दिवसांत त्याच्याजवळ बसायला कुणी नव्हतं.
त्या दिवशी त्या माणसाने पहिल्यांदा आपल्या घराकडे वेगळ्या नजरेने पाहिलं.
तिथे आई होती. बायको होती. मुलं होती.
हसण्याचे आवाज होते. चहाचा सुगंध होता. आणि त्याला जाणवलं... "मी घराच्या भिंती मोजत होतो; पण घरातली माणसं मोजायलाच विसरलो."
हीच कृतज्ञतेची ताकद आहे.
कृतज्ञता म्हणजे समस्या नाहीत असं मानणं नव्हे.
कृतज्ञता म्हणजे समस्यांमध्येही आयुष्यात उरलेलं सुंदर पाहणं.
पाऊस पडला आणि छत्री नाही, याची तक्रार करण्यापेक्षा पाऊस थांबेपर्यंत आपल्याला आसरा देणाऱ्या घराचे आभार मानणे.
आजारी पडलो तर शरीराने आपल्याला दिलेल्या असंख्य निरोगी दिवसांची आठवण ठेवणे.
अपयश आलं तर "सगळं संपलं" म्हणण्याऐवजी "या अनुभवाने मला काय शिकवलं?" असं विचारणं. आणि सर्वांत महत्त्वाचं...
आपल्या आयुष्यात असलेल्या माणसांची किंमत त्यांच्या अनुपस्थितीत कळण्याआधी त्यांच्या उपस्थितीबद्दल कृतज्ञ होणं.
विज्ञानही आज हेच सांगतं. मानसशास्त्रज्ञांच्या अभ्यासानुसार, जे लोक रोज कृतज्ञता व्यक्त करतात, त्यांच्या मनात सकारात्मक रसायने अधिक प्रमाणात तयार होतात. तणाव कमी होतो, झोप सुधारते, नाती अधिक घट्ट होतात. म्हणजे कृतज्ञता ही केवळ अध्यात्मिक संकल्पना नाही, तर ती आनंदी आणि निरोगी जगण्याचं शास्त्रही आहे.
"आनंद मिळवण्यासाठी आयुष्यात सगळं परिपूर्ण असण्याची गरज नाही; जे आहे त्याकडे प्रेमाने पाहण्याची गरज आहे. तक्रार करणारा माणूस सुखाच्या शोधात आयुष्य घालवतो; पण कृतज्ञ माणूस साध्या क्षणांतही सुख शोधतो. म्हणून आजपासून रोज तीन गोष्टींसाठी मनापासून धन्यवाद द्या. कारण कृतज्ञता परिस्थिती बदलत नाही... ती परिस्थितीकडे पाहण्याची आपली नजर बदलते. आणि नजर बदलली की साधं आयुष्यही सुंदर वाटू लागतं."
जेव्हा तुम्ही तक्रारींची दारे कायमची बंद करून कृतज्ञतेची गुरुकिल्ली मनाच्या गाभाऱ्यात जपाल, तोच तुमच्या आयुष्यातील सर्वात मोठा 'विजय' असेल.जे आहे त्यात आनंद शोधा, लोकांचे आभार माना आणि प्रत्येक क्षणाचा उत्सव करा... कारण हाच 'विचार ते विजय' या प्रवासाचा खरा आणि अंतिम गाभा आहे!



# महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

## 'आत्या' : माहेरच्या मायेचा एक हळवा कोपरा

पुढे....
माझ्या लहानपणाच्या अनेक आठवणी आत्याशी जोडल्या गेल्या आहेत. त्या आठवणी लिहायच्या म्हटलं, तर आत्याच्या उल्लेखाशिवाय त्या पूर्ण होणारच नाहीत. तसं तर मला दीर्घकाळ आत्याची माया लाभली. मी लहान असताना, नोकरीला लागल्यानंतर तसेच पुढे लग्न झाल्यावरही तिने माझं भरभरून कौतुक केलं आहे. माझी आत्या कल्याणला राहायची. आत्या आणि तिचे यजमान यांनी माझ्या मनावर उत्तम संस्कारांचं शिंपण केलं, त्यातून मी खूप काही शिकलो.
माझं लहानपण एका अगदी छोट्या खेड्यात गेलं. पण आत्या कल्याणला राहत असल्याने मी दर सुट्टीत तिच्याकडे जायचो. ग्रामीण भागात राहत असलेल्या माझ्यासारख्या अजाण मुलाला शहरी संस्कृतीचा स्पर्श आणि ओळख तिच्यामुळे झाली. आत्याच्या यजमानांनी स्वतः माझ्यासोबत फिरून त्यावेळची मुंबई मला दाखवली आणि अनेक गोष्टींची माहिती दिली. त्यांनीच मला तेव्हा 'मनाचे श्लोक' हे पुस्तक भेट दिलं होतं. ते मला म्हणाले होते, "विश्वास, हे श्लोक पाठ कर. ते पाठ झाले की मला सांग." त्याप्रमाणे मी तेव्हा सगळे श्लोक पाठांतर केले होते. त्यांनी त्यावेळी मला एक वही आणि पेन बक्षीस म्हणून दिले होते.
(क्रमश:)

# कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495





## आतुरता कृष्णजन्माची.....

पुढे
म्हणून सृष्टी म्हणजे अस्तित्वाची निर्मिती नसून अस्तित्वाचे प्रकटीकरण आहे.
४. "प्रवेश" म्हणजे काय?
सन्निपत्य समुत्पाद्य दृश्यन्तेऽनुगता इव ।
प्रागेव विद्यमानत्वान्न तेषामिह सम्भवः ॥ १६ ॥
ही तत्त्वे परस्पर एकत्र येऊन विश्वाची निर्मिती करतात आणि निर्माण झालेल्या विश्वामध्ये प्रवेश केल्याप्रमाणे दिसतात. पण प्रत्यक्षात त्यांचा असा नवीन प्रवेश होत नाही; कारण ते निर्माण होण्यापूर्वीपासूनच कारणरूपाने विद्यमान असतात.
इथे भागवत एक विलक्षण तत्त्व सांगते– कारण कार्यामध्ये येते, पण कारणाचे स्वतंत्र अस्तित्व नष्ट होत नाही.
मातीपासून घट बनतो.घटात माती "नंतर प्रवेश" करत नाही.
घट बनण्यापूर्वीही माती होती. त्याचप्रमाणे परमात्मा सृष्टी निर्माण करून नंतर तिच्यात प्रवेश करत नाही. तो आधीपासूनच सर्वांचा आधार आहे. म्हणून "भगवान जगात आले" हे भक्तीच्या भाषेत योग्य आहे;पण तत्त्वज्ञानाच्या भाषेत–भगवान कुठून आले नाहीत; उलट त्यांच्यापासूनच सर्व काही व्यक्त झाले.
५. इंद्रियांना भगवान का दिसत नाहीत?
एवं भवान् बुद्ध्यनुमेयलक्षणैः
ग्राह्यैर्गुणैः सन्नपि तद्गुणाग्रहः ।
अनावृतत्वाद् बहिरन्तरं न ते
सर्वस्य सर्वात्मन आत्मवस्तुनः ॥ १७ ॥
बुद्धी ज्यांचे अनुमान करू शकते आणि इंद्रिये ज्यांना विषय म्हणून ग्रहण करू शकतात, त्या गुणांच्या मध्ये आपण उपस्थित असूनही त्या गुणांमुळे आपले खरे स्वरूप जाणता येत नाही. कारण आपण सर्वांचे अंतरात्मा आणि सर्वांचे आत्मस्वरूप आहात. आपल्यासाठी "बाहेर" आणि "आत" असा भेदच नाही.
हा श्लोक तर संपूर्ण वेदान्ताचा सार आहे. जे दिसते ते भगवान नाही; जे दिसण्याला शक्य करते ते भगवान. (क्रमश:)

# गावखेड्यातील फुकणी

ज्योतिर्मय साहित्य

गावखेड्यावर जणू निसर्गाने कृपाच केली असे म्हणायला काहीच हरकत नाही. नुसते गावखेड्याचे नाव जरी ऐकायला आले तरी डोळ्यासमोर तो संपूर्ण गावखेडा,त्यातील संस्कृती, आपुलकी जणू क्षणभरासाठी का होईना तिथेच घेऊन जाते आणि मनाली उभारी देते. अशा असंख्य संस्कृतीने व गुणाने भरलेला गावखेडा कोणाला बरं आवडणार नाही. ..? अशीच एक जुनी संस्कृती गावखेड्यात आहे आणि ती संस्कृती दैनंदिन जीवनातील आहे चला तर मग या संस्कृतीविषयी थोडक्यात जाणून घेऊया.




घरात कित्येक वस्तू असतील तरी त्या प्रत्येक वस्तूंशी आपुलकी जुळून असते आणि खास करून महिलांमध्ये जरा जास्तच आपुलकी कुटून भरलेली असते. कारण घरात असलेल्या लहान, सहान वस्तूंवर त्यांची बारीक नजर असते. अशीच एक लहानशी वस्तू आहे आणि खास करून तिच्याशी महिला वर्ग जुळलेली असते आणि वस्तू एक प्रकारची गावखेड्यातील संस्कृती आहे त्या वस्तूला झाडीबोली भाषेत ''फुकणी'' असे म्हणतात तर कोणी नरी सुद्धा म्हणतात. ही फुकणी सुकलेल्या बांबूपासून तयार केलेली असते तर कोणी लोखंडापासूनही तयार करतात.ही फुकणी खास करून महिलांची आवडती वस्तू आहे.
चुलीवर स्वयंपाक करायचे असते जेव्हा, चूल पेटत नाही त्यावेळी फुकणीचा आधार घेऊनच चूल पेटवली जाते तेवढाच लवकर स्वयंपाक तयार होतो.गावखेड्यात घरोघरी भलेही गॅस उपलब्ध जरी असेल तरी प्रत्येकांनाच गॅस टाकी भरणे होईलच असे नाही म्हणून त्या चुलीवरच स्वयंपाक करतात,चुलीवर पाणी गरम करतात. आणि हे सर्व करण्यासाठी ही लहानशी फुकणी सुध्दा आधार देत असते.ही फुकणी जरी लहान असेल तरी काम मोठा करत असते म्हणूनच महिला वर्ग सकाळ, संध्याकाळ तिला हाती धरून तिच्याद्वारे चूल पेटवत असतात.ही फुकणी गावखेड्यातील एक ओळख आहे. ती बाजारात विकत मिळत नाही तर लहानशा सुकलेल्या बांबूपासून ती तयार होते. या फुकणीशी घरातील सर्वच सदस्य जुळलेले असतात.जे, कोणी चुलीजवळ बसले असतात. थोडावेळासाठी का होईना विस्तो पेटला नाही की त्याच फुकणीला हातात धरून तिच्यात फुकूंन चूल पेटवतात. कोणी म्हणतात की, वस्तू लहानशी, ''रंगाने नाही रुपाने नाही, पण गुणाने मोठी असते''

अशीच ही गावखेड्यातील फुकणी जणू गावखेड्याची शान आहे.



सौ.संगीता संतोष ठलाल
मु.कुरखेडा जि.गडचिरोली
७८२१८१६४८५

आजही कित्येक घरी ही फुकणी बघायला मिळत असते. मातीच्या चुलीजवळ, शेगडी जवळ ती ठेवलेली असते.असे वाटते की तिचे मातीच्या चुलीशी व मातीच्या भांड्यांशी अतूट नाते आहेत अशी ही गावखेड्यातील फुकणी वयाने मोठे असणाऱ्यांना तर माहितच आहे पण, वयाने लहान असणाऱ्या मुलांना फुकणी कशाला म्हणतात जरी विचारले तर पटकन सांगतात अशी ही जुनी वस्तू आणि गावखेड्यातील संस्कृती फुकणी गावखेड्यातच बघायला मिळते. तिच्याने फुकूंन चुलीत काड्या पेटवल्या जातात आणि भरभर चूल पेटत असते एवढेच नाही तर चुलीवरचा स्वयंपाक अजून चविष्ट बनत असतो कारण तो चविष्ट अन्न तयार करण्यासाठी ही लहानशी फुकणी सुध्दा मदत करत असते ती फुकणी सुध्दा गुणाची आहे.

# मांगल्याच लेणं असलेला - श्रावण महिना

ज्योतिर्मय साहित्य




भारतीय संस्कृतीत मराठी महिन्यांचे आगळे -वेगळे महत्व आहे. मराठी महिन्यातील बारा महिन्यात श्रावण महिना हा मांगल्य, व पुण्य प्राप्ती करून देणारा महिना मानल्या जातो. हा महिना धार्मिक, नैसर्गिक, सृष्टी विषयक सर्वच दृष्टीने सुद्धा मनांना हर्ष, आनंद, उत्साह, व प्रफुल्लित करणारा महिना समजला जातो. धरित्री सर्वत्र हिरवे रूप धारून करून निसर्गाचे सौंदर्य वाढविण्यासाठी भर घालते. नद्या, नाले, ओढे खळ - खळ वाहतात,रिमझिम - रिमझिम श्रावण सरी अधून- मधून बरसून या निसर्ग सौंदर्यात मोठी भर घालतात. नदीवरील धबधबे मनाला आकर्षित करतात. श्रावण सरीत सर्वांना भिजणे आवडते. विशेषतः तरुणाई या श्रावण सरींचा आनंद घेतात. सर्विकडे हिरवळ, हिरवी झाडे, झुडपे हे दृश्य पशु -पक्षांच्या मनाना भावणारे असते. गुरा-ढोरांना हिरवे गवत मिळते, पक्षीही या सृष्टीत रममाण होऊन मनसोक्त पणे विहार करून आपल्या मधुर आवाजाने आपला आनंद व्यक्त करतात. विशेष म्हणजे या पावन व मंगलमय महिन्यात येणारे, सण व उत्सव मानवी मन प्रफुल्लित, आनंदी व उत्साही करतात.



धोंडीरामसिंह ध. राजपूत
वैजापूर, छत्रपती संभाजीनगर
मो. ९४२१३१२२४४

बरीच मंडळी या महिन्यात महादेव मंदिराला सकाळीच जाऊन एक तांब्याभर पाणी वाहतात. असे म्हणतात की, भगवान शंकरला किंवा महादेव पिंडीला'' एक लोटा जल - समस्याओंका हल'' असे मानतात की, श्रावण महिन्यात महादेव जी मनोभावे पूजा केल्यास आपल्या मनातील ईच्छा पूर्ण होतात. विशेषतः ज्या अविवाहित मुली असतात, त्यांच्या प्रार्थना किंवा त्यांची मनीषा भोळे शंकर पूर्ण करतात म्हणून या महिन्यात महादेवाला जाणाऱ्या मुलींची संख्या जास्त असते.

श्रावण महिन्यात सणाची रेल-चेल असते, नागपंचमी, पतेती, रक्षाबंधन, स्वातंत्र्य दिन, ईद - ए - मिलाद, श्रीकृष्ण जयंती, गोपाल काला, या वर्षी तर पोळा सुद्धा श्रावण महिन्यातच आहे. हे सण व उत्सव

ही मानवी जीवनात हर्ष, आनंद, उत्साह पेरतात. एकंदरीत बघता श्रावण महिना नैसर्गिक दृष्टया, धार्मिक दृष्टीने, भौगोलिक दृष्टीने, पर्यावरण दृष्टीने सर्वच बाबतीत मनुष्य जगताला,प्राणी व पशु-पक्षी जगताला, आनंद व उत्साह देणारा महिना आहे. म्हणूनच श्रावणाला मांगल्याचे लेणं असलेला महिना मानतात.

# विटाळ ''देहाचा'' कि ''बुरसटलेल्या'' विचारांचा

ज्योतिर्मय साहित्य
(मागील अंकावरून)

आज मार्केट मध्ये स्यांनीटरी पॅड वडील, भाऊ, पति हे लोक विकत घेताना आपण पाहत आहोत. हा खूप मोठा वैचारिक बदल घडत आहे. खरेतर शरीराचं आणि मनाचं तसेच विचाराचे विटाळ आपल्या आत्मज्ञानानेच घालवावा लागतो. आईच्या स्तनाच्या ३२ धारांचे दूध पिऊन जगणारं बाळ. इतकी महान आई तर याच आईला तिच्या ओल्या बाळंतपणात ''ती विटाळलेली आहे. तिला शिवू नका. तिच्या जवळ जाऊ नका. असे म्हंटले जाते. या विचारांना कुठेतरी चांगल्या विचारांची सांगड व शुद्ध विचारांचे खतपाणी घालून थांबवले पाहिजे.



संत सोयराबाई यांनी आपल्या अभंगातून व शुद्ध विचारातून समाज प्रबोधन करीत विटाळा बाबत आपले विचार जन-मानसापर्यंत पोहोचविण्याचे शुद्ध व पवित्र समाज प्रबोधनाचे कार्य केले आहे. संत सोयराबाई म्हणतात, जर स्त्रीला विटाळ नसेल तर जगाची उत्पत्ती वा निर्मिती व नविन जिव वा देह जन्माला येणारच नाही. देहातील विटाळ आणि मानवी मनाचे बुरसटलेले विचार यावर संत सोयराबाईंनी परखडपणे विचार मांडत प्रकाश टाकला आहे. संत सोयराबाई म्हणतात, विटाळ हा देहाचा अविभाज्य अंग आहे.

देहातून देहाची निर्मिती, उत्पत्ती होते. या सर्व गोष्टी ईश्वर निर्मित आहेत. इवल्याशा नाजूक जिवाचा, देहाचा जन्म. त्या इवल्या जीवाला, देहाला विटाळ म्हणणे योग्य आहे का?. खरे तर विटाळ म्हणजे समाजाला, मानवी विचाराला लागलेली कीड होय. आणि ही कीड म्हणजेच वैचारिक विटाळ होय''. अशा परखड विचारातून संत सोयरा बाईंनी सामाजिक विषमतेलाच अशुद्ध विचारांना विरोध केला. संत चोखामेळा यांच्या पत्नी संत सोयराबाई ''विटाळा'' बाबतीत म्हणतात,

देहासी विटाळ म्हणती सकळ
आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध
देहींचा विटाळ देहीच जन्मला
सोवळा तो जाहला कवण धर्म

त्या ५ दिवसातल्या वेदनांना सहन करत असलेल्या आई, बहीण, मुलगी, सून या सर्व स्त्रियांना घरातील सर्वजण समजून घेत त्यांना आराम दिलं तर नक्कीच त्या स्त्रियांची शारीरिक, मानसिक अवस्था नक्कीच सुधारेल.



सौ. मनीषा सोन्नेकर/सोनकांबळे
देगलूर. 9960028899

# हुकलेल्या एका गुणाची गोष्ट

ज्योतिर्मय साहित्य
(मागील अंकावरून)




मी भानावर आलो. मुलाचे डोळे अजूनही डबडबलेले होते. त्याच्या छोट्याशा हातातली पेन्सिल अजूनही वहीवरच्या त्या गणितापाशीच थांबली होती. मी त्याला जवळ घेतलं आणि हळूच म्हटलं ''बाळा सॉरी... बाबा चुकला. तुला माहितीये? लहानपणी बाबासुद्धा गणितात अशाच चुका करायचा.'' माझं हे बोलणं ऐकून त्याच्या रडवेल्या चेहऱ्यावर जणू सुखाचं चांदणं चमकलं आणि त्याने मला घट्ट मिठी मारली.

मुलांना परिपूर्ण बनवण्याच्या धावपळीत आपण त्यांचं निरागसपण, त्यांचं धाडस आणि चुका करण्याचं स्वातंत्र्य तर हिरावून घेत नाही ना? हा प्रश्न त्या दिवशी मला आतून खोलवर अस्वस्थ करून गेला. गुण महत्त्वाचे असतातच; पण त्याहून कितीतरी अधिक महत्त्वाचा असतो शिकण्याचा निखळ आनंद आणि पुन्हा उभं राहण्याचा आत्मविश्वास.



मंगेश दौंडकर, पुणे,
मो.- 9890619354

आयुष्याची बेरीज असो वा गणिताची... हातचा सुटला म्हणून कधी प्रवास संपत नसतो. चुका या अपयशाची पावती नसतात; त्या आपण प्रयत्न करत असल्याचा जिवंत पुरावा असतात. म्हणून मुलांना गुणांच्या बंदिस्त चौकटीत अडकवण्यापेक्षा त्यांना चुका करण्याची मोकळीक, त्या स्वीकारण्याचं शहाणपण आणि त्या सुधारण्याचं धाडस द्यायला हवं. कारण याच छोट्या आणि निष्पाप चुकांमधून उद्याची सुंदर आणि प्रगल्भ पिढी घडत असते.

## काव्यशास्त्र : कविता लिहिण्यापूर्वी भाग - ५



शांडिल्यगोत्रोत्पन्नभालेरावमुकुन्दोऽहम्
छत्रपतीसम्भाजीनगरम्
विद्युतसन्देशसूत्रम् - bhalerao.mukund@gmail.com
भ्रमणभाषक्रमान्कः ८३०८८३५३१३

### अलंकार : काव्याचे सौंदर्य

उपमा कालिदासस्य भारवेरर्थगौरवम् ।
दण्डिनः पदलालित्यं माघे सन्ति त्रयो गुणाः ॥

भारतीय काव्यपरंपरेत हा सुप्रसिद्ध श्लोक आहे. कालिदासांच्या काव्यात उपमांचे अप्रतिम सौंदर्य, भारवींच्या काव्यात अर्थाची गहनता, दंडींच्या लेखनात शब्दांची लालित्यपूर्ण मांडणी आणि माघ यांच्या काव्यात हे तिन्ही गुण एकत्र दिसतात. या श्लोकावरून एक गोष्ट स्पष्ट होते कि, महान कवी केवळ भावना व्यक्त करत नाहीत; ते त्या भावनांना कलात्मक रूप देतात. त्या कलात्मकतेचे एक महत्त्वाचे साधन म्हणजे अलंकार.

◆ अलंकार म्हणजे काय?
'अलंकार' म्हणजे अलंकरण, शोभा किंवा सौंदर्य वाढविणारी गोष्ट. जसे दागिन्यांमुळे व्यक्तीचे सौंदर्य खुलते, तसेच योग्य अलंकारांमुळे कवितेची अभिव्यक्ती अधिक प्रभावी, चित्रमय आणि स्मरणीय होते. मात्र एक गोष्ट लक्षात ठेवावी लागते. दागिनेच व्यक्तिमत्त्व नसतात; तसेच अलंकार म्हणजे कविता नव्हे. कविता प्रथम भावपूर्ण असावी; अलंकार तिचे सौंदर्य वाढविण्यासाठी असतात.

◆ शब्दालंकार आणि अर्थालंकार
भारतीय काव्यशास्त्रात अलंकारांचे अनेक प्रकार सांगितले आहेत. त्यांपैकी दोन मुख्य विभाग आहेत—शब्दालंकार आणि अर्थालंकार. शब्दांच्या ध्वनीसौंदर्यावर आधारलेले अलंकार म्हणजे शब्दालंकार; तर कल्पना, अर्थ, तुलना आणि भाववैचित्र्य यांवर आधारलेले अलंकार म्हणजे अर्थालंकार. उपमा, रूपक, उत्प्रेक्षा, दृष्टान्त, अपन्हुती, अतिशयोक्ती, विरोधाभास, श्लेष इत्यादी अर्थालंकार काव्याला वैचारिक आणि कलात्मक उंची देतात.

◆ उपमा - अलंकारांचा सम्राट
उपमा हा सर्वाधिक लोकप्रिय अलंकार आहे. कालिदासांना तर 'उपमा कालिदासस्य' असे विशेषणच प्राप्त झाले आहे. उपमा म्हणजे दोन भिन्न गोष्टींतील एखाद्या समान गुणाच्या आधारे केलेली तुलना. परंतु प्रत्येक तुलना उपमा होत नाही. ती स्वाभाविक, समर्पक आणि नवी असली पाहिजे. उदाहरणार्थ, चंद्रासारखा चेहरा, कमळासारखे डोळे अशा उपमा इतक्या वापरल्या गेल्या आहेत की, त्यांचा प्रभाव कमी झाला आहे. याउलट एखाद्या कवीने नवा दृष्टिकोन दिला, तर ती उपमा लक्षात राहते. म्हणूनच नवोदित कवींनी जुन्या उपमांची पुनरावृत्ती करण्यापेक्षा स्वतःच्या अनुभवातून नवीन प्रतिमा शोधण्याचा प्रयत्न करावा.

◆ अलंकारांचा अतिरेक टाळा
अनेक नवोदित कवी एकाच कवितेत शक्य तितके अलंकार वापरण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे कविता कृत्रिम वाटू लागते. अलंकारांचा वापर मीठाप्रमाणे असावा. मीठ योग्य प्रमाणात असेल तर अन्नाची चव वाढते; पण तेच प्रमाण जास्त झाले तर पदार्थ खाण्यायोग्य राहत नाही. कवितेचेही तसेच आहे. सहजपणे आलेला अलंकार वाचकाला आनंद देतो; जाणीवपूर्वक लादलेला अलंकार मात्र कविता दुर्बल करतो.

◆ अभ्यासाची दिशा
अलंकार समजून घेण्यासाठी केवळ व्याख्या पाठ करून उपयोग नाही. महान कवींच्या रचनांमध्ये अलंकार कसा सहजपणे येतो, हे पाहणे अधिक महत्त्वाचे आहे. कालिदास, भारवी, माघ, भवभूती, ज्ञानेश्वर, मोरोपंत, कुसुमाग्रज, माधव ज्युलियन, स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे साहित्य वाचताना अलंकारांची प्रत्यक्ष अनुभूती येते. अशा वाचनातूनच कवीची अभिव्यक्ती अधिक समृद्ध होत जाते.

◆ निष्कर्ष
अलंकार हे काव्याचे सौंदर्य आहेत; परंतु तेच काव्य नाहीत. भाव, रस आणि विचार यांना अधिक प्रभावी स्वरूप देण्यासाठी अलंकारांचा उपयोग करावा. ज्या अलंकारामुळे अर्थ उजळतो, भाव अधिक स्पष्ट होतो आणि कविता अधिक संस्मरणीय बनते, तोच खरा अलंकार.

शेवटी एवढेच अलंकार काव्यात दिसू नयेत; ते अनुभवास यायला हवेत. हीच श्रेष्ठ काव्याची खूण आहे. (क्रमशः)

पुढील भाग ६ : वृत्त, छंद आणि लय - कवितेचे संगीत

## 'मेघमल्हार धुन सावन की, जयजयकार शिव जी की!'

लेखिका - डॉ. मीना श्रीवास्तव, ठाणे.





आगे......
वर्षा की फेनिल धाराओं धारा के कवि का मन ऐसा डोलने लगता है कि, वह बारम्बार सावन के आने की प्रतीक्षा करने लगता है।

"पकड़ वारि की धार झूलता है मेरा मन,
आओ रे सब मुझे घेर कर गाओ सावन!
इन्द्रधनुष के झूले में झूलें मिल सब जन, फिर फिर आए जीवन में सावन मन भावन!"

उज्जयिन्यां महाकालं ओम्कारम् अमलेश्वरम्॥
परल्यां वैद्यनाथं च डाकिन्यां भीमशङ्करम्।
सेतुबन्धे तु रामेशं नागेशं दारुकावने॥
वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यम्बकं गौतमीतटे।
हिमालये तु केदारं घुश्मेशं च शिवालये॥

मित्रों, बारह ज्योतिर्लिंगों में ही नहीं, बल्कि हर शिवभक्त के प्राणों में बसे देवों के देव महादेव की आराधना करने के लिए सर्वोत्तम ऐसा सावन का महीना भगवान शिव को समर्पित है।

जिस मनोरम प्रकृति के हर रूप में ईश्वर का निवास है, वहीं प्रकृति अपने सबसे सुन्दर रूप का शृंगार कर भोलेनाथ की पूजा में तल्लीन हो जाती है। इस माह में चंद्रमा श्रवण नक्षत्र में होते हैं, इसलिए इस महीने को श्रावण या सावन कहा जाने लगा। शास्त्र कहते हैं कि सावन के महीने से भगवन विष्णु चौमासे के लिए योगनिद्रा में चले जाते हैं। इसलिए महादेव सृष्टि का संचालन करने लगते हैं और इस महीने में भूलोक पर आते हैं।

भगवान शिव को सोमनाथ अर्थात सोम (चंद्र के स्वामी) और जलदेव (वर्षा के स्वामी) भी कहा जाता है। जलाभिषेक से सम्बंधित एक प्रचलित पौराणिक कथा के अनुसार, सावन के महीने में समुद्र मंथन के दौरान "हलाहल" नामक विष निकला था। समस्त सृष्टि की रक्षा करने के लिए भगवान शिव ने विष ग्रहण कर लिया था, जिसके कारण उनका गला नीला पड़ गया। तब से वे "नीलकंठ" कहलाए।

उस समय उनके गले पर विष का प्रभाव कम करने के लिए देवताओं ने उन्हें जल अर्पित किया था। मुझे तो यहीं प्रतीत होता है कि शिव ऐसे इकलौते अल्पसंतोषी भगवान हैं जो श्रद्धापूर्वक अर्पण किये हुए जल तत्व को ग्रहण कर प्रसन्न होते हैं। भगवान शिव की पूजा-अर्चना करने के लिए सावन के सोमवार को उपवास, उपासना और जलाभिषेक महत्वपूर्ण माने जाते हैं। (क्रमशः)

## कृषि-सागर



सागर राजेंद्र सोनवणे
BSc.Agri.
मो. 77578 47104
ताडपिंपळगाव ता.कन्नड
जिल्हा छत्रपती संभाजीनगर

### मोसंबीच्या आंबिया बहारातील फळगळ

मोसंबीच्या आंबिया बहारातील जुले ते सप्टेंबर दरम्यान होणारी फळगळ ही प्रामुख्याने सततचा पाऊस, हवेतील जास्त आर्द्रता, कलेक्टोट्रिकम व फायटोप्थोरा बुरशीचा प्रादुर्भाव, अन्नद्रव्यांची कमतरता आणि पाणी साचणे या कारणांमुळे होते.

या कालावधीत फळगळ रोखण्यासाठी खालीलप्रमाणे एकात्मिक उपाययोजना कराव्यात:

१. बागेतील मशागत व पाण्याचा निचरा
पाण्याचा निचरा: बागेत किंवा झाडांच्या बुंध्याशी पाऊस व पाण्याचा साचलेपणा राहू देऊ नका. साचलेले पाणी बाहेर काढण्यासाठी चारी (Drainage channels) काढा.
गळलेली फळे नष्ट करणे: झाडाखाली गळून पडलेली रोगग्रस्त फळे गोळा करून बागेबाहेर खड्ड्यात गाडून नष्ट करा, जेणेकरून बुरशीचा प्रसार थांबेल.

२. बुरशीजन्य फळगळीवर फवारणी (जुले ते सप्टेंबर)
जुले ते सप्टेंबर दरम्यान पावसाचे प्रमाण जास्त असते, त्यामुळे बुरशीनाशकाची फवारणी करताना स्टिकर (Spreader) १ मिल प्रति लिटर पाण्यात टाकावे.
कलेक्टोट्रिकम (अँथ्रॅक्नोज / काळा करपा व देठकूज) साठी:
फवारणी १ (प्रतिबंधात्मक): कॉपर ऑक्सिक्लोराईड (ब्ल्यू कॉपर) २.५ ग्रॅम किंवा मॅन्कोझेब (एम-४५) २.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी.
फवारणी २ (प्रादुर्भाव दिसल्यास): रोको (Thiophanate Methyl) १.५ ग्रॅम किंवा बाविस्टिन (Carbendazim) १ ग्रॅम किंवा ॲझॉक्सीस्ट्रॉबिन + डिफेनोकोनॅझोल (कस्टोडिया / ॲमिस्टार टॉप) १ मिली प्रति लिटर पाणी. (क्रमशः)

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559